**Shikshan Sanshodhan : Journal of Arts, Humanities and Social Sciences** ISSN: 2581-6241 Volume - 3, Issue - 3, May-June – 2020
Bi-Monthly, Peer-Reviewed, Refereed, Indexed Journal Impact Factor: 3.589
Received on : 04/06/2020 Accepted on : 24/06/2020 Publication Date: 30/06/2020

# धार्मिक दृष्टीकोनातील संगीत - एक अध्ययन

**स्वरानंद बालासाहेब सूर्यवंशी**
पीएच्.डी. विद्यार्थी
संगीत विभाग, मुंबई विद्यापीठ, मुंबई
Email - swaranand111@gmail.com

**सारांश :** धार्मिक परंपरेसोबतच भारतीय संगीत परंपराही अतिशय प्राचीन आहे. कारण प्राचीन वेदकालीन संस्कृतीपासून ते आजतागायत चालत आलेल्या प्रत्येक धार्मिक कार्यामध्ये संगीताचा प्रयोग केला जातो. संगीताचा सुयोग्य वापर केल्यानंतर काय होऊ शकते हे जाणून धर्मप्रचारक साधू-संतांनी धर्मप्रसारासाठी व सर्वसामान्य लोकांना ईश्वराकडे खेचून घेण्यासाठी संगीताचा वापर मोठ्या खुबीने केला. ज्याप्रकारे धर्मात चित्त एकाग्र करण्यासाठी संगीताचा आधार घेतला जातो त्याप्रकारे आध्यात्मिक उन्नतीसाठीही संगीताचा आश्रय घेतला जातो. मुळात भारतीय संगीत हेच आध्यात्मिक संगीत आहे. मन व चित्त एकाग्र करणे त्यासोबतच साहित्यातील भाव पोहचवण्यासाठी संगीताचा उपयोग केला जातो. एकुणच धर्मशास्त्रासोबत अध्यात्म, साहित्य व संगीत हे एकमेंकांच्या हातात हात घालुन मार्गक्रमण करीत आहेत. व ते एकमेकांशिवाय अपूर्ण आहेत. यासोबतच धार्मिक उत्थानाकरिता स्थापीत झालेल्या मंदीर, मठ, संस्थान आणि त्यातून निर्माण झालेल्या धार्मिक परंपरा जपण्यासाठी विविध प्रकारच्या माध्यमातून धार्मिक उत्सव व सांगितीक कार्यक्रमांचे आयोजन करून संगीताचा आधार घेतला जातो. त्यासोबतच देव व भक्त यांतील दुवा असलेल्या संतांनी गोरगरीब पिचलेल्या लोकांना आधार देऊन परमेश्वराविषयी व एकमेकांविषयी आदर व प्रेमभाव निर्माण करून समाजाला उभारी देण्याचे महानतम कार्य केले. त्यासाठी संतांनी गेय रचनांचा असंख्य मोठा महासागर निर्माण केला. एकंदरीत धार्मिक दृष्टीकोनातील प्रत्येक घटकांमधून संगीताचा पुरेपूर वापर करून घेतलेला दिसतो ।

**प्रमुख शब्द :** धर्म, अध्यात्म, साहित्य, धार्मिक संस्थान, धार्मिक परंपरा, संत आणि संगीत ।

## १. प्रस्तावना :

भारतीय संगीताची परंपरा ही अतिशय प्राचीन आहे. जिथे संगीत हे मुळातच धर्माच्या बरोबरीने जन्माला आले व धर्माच्या साथीनेच सर्वत्र प्रसार पावत आहे. म्हणूनच संगीत हे मनोरंजना सोबतच मोक्षप्राप्तीचेही साधन आहे. मानवी मनावर थेट प्रभाव टाकून अधिराज्य गाजवण्याचे सामर्थ्य हे केवळ भारतीय संगीतामध्येच आहे. म्हणूनच प्राचीन काळापासून धर्माच्या साथीने संगीताचे मार्गक्रमण होत असल्याचे दिसते. धार्मिक दृष्टीकोनासोबतच संगीताच्या इतिहासामध्ये डोकावून पाहील्यास असे लक्षात येते की, संगीताची उत्पत्ती ही वेदांपासून झाली. आणि संगीताचा वापर हा तेव्हापासूनच यज्ञयागादि पावन अशा धार्मिक प्रसंगी केला जात असे. म्हणूनच सांगितीक विद्वानांनी संगीतातील नादाला ईश्वराची उपमा देऊन 'नादब्रम्ह' असे म्हंटले आहे व त्याची उपासना केली आहे. तसे पाहीले तर संगीत आणि धर्म या दोन्हीही गोष्टी तशा समांतर अशाच आहेत. म्हणुन ते सदैव एकमेकांच्या आश्रयाला दिसून येतात.

जिथे धर्माला संगीताच्या माध्यमातून सहजता व भाव निर्माण करता आले तिथे संगीताला धर्माच्या माध्यमातून संस्कार तसेच पवित्रता व नम्रता प्राप्त झाली. संगीताच्या माध्यमातून ईश्वर साधना केल्याने एक भक्तीमय वातावरण तयार होऊन एक चैतन्य निर्माण होते. आणि त्याच शक्तीला ओळखुन सर्व जाती धर्माच्या धर्मप्रचारकांनी आपापल्या धर्माच्या प्रचार आणि प्रसारासाठी एक शक्तीशाली माध्यम म्हणून संगीताचा उपयोग करून घेतला व घेत आहेत. धार्मिक दृष्टीकोनातून संगीताच्या प्रचार प्रसाराविषयी लिहीतांना धर्म आणि संगीताबरोबरच अध्यात्म आणि संगीताचा संबंध, संगीत आणि साहीत्य, धार्मिक परंपरा आणि धार्मिक साहित्य, संगीत आणि मन, संतांची भुमिका, संतांच्या माध्यमातून निर्माण झालेली आश्रम, मठ, धार्मिक संस्थाने इत्यादिद्वारे धार्मिक दृष्टीकोनातून सर्वत्र अखंड वाहत असलेली भक्तीपरंपरा यांची थोडक्यात माहिती खालीलप्रमाणे घेता येईल.

## २. धर्म आणि संगीत यांचा संबंध :

भारतात प्राचीन काळापासूनच अनेक धर्म, सांप्रदाय, पंथ प्रचारात आहेत. आणि त्यांचे धर्मगुरू व अनुयायी यांनी कितीही संकटे वा आव्हाने त्यांच्यावर आली तरी आपापल्या धर्म, पंथाचे व त्यासोबतच संगीताचे अस्तित्व अबाधित ठेवले. सर्व अधिकारी व्यक्ती, समाज किंवा राष्ट्राने ठरवून दिलेली गौरवपूर्ण तत्वे, आदर्श मूल्ये, आचारविचार एकत्रितपणे जपल्यानंतर तयार होणारे त्याचे एकत्रित रूप म्हणजे धर्म संस्कृती होय. एकंदरीत मानवता, खानपान, चालीरीती, व्यवहार इ. म्हणजे धर्म संस्कृती नाही तर आदर्श समाजाची उभारणी करण्यास पोषक ठरतील असे वैयक्तीक वर्तन, नियम - बंधने इ. पाळणे म्हणजेच खरा धर्म आणि संस्कृती होय. प्रत्येक धर्म पंथाच्या उगमस्थानी ईश्वराचा किमान एकतरी अवतार किंवा कोणती तरी ईश्वरीशक्ती असतेच. मग त्या धर्माच्या किंवा त्या दैवताच्या

परंपरेनुसार विविध पध्दतीच्या उपासना, पूजाअर्चा, आरत्या, पालख्या व दिंडी इ. अनेक प्रकारचे धार्मिक विधी व उत्सवांचे आयोजन करून त्या माध्यमातून जनसामान्यांमध्ये धार्मिकतेचा प्रचार व प्रसार चोहीकडे अखंडीतपणे सुरू आहे.

धर्म आणि संगीत याविषयी आपण असे म्हणू शकतो की, धर्मांचा आत्मा म्हणजे संगीत होय. सर्व धर्मांचा संबंध हा मानवाच्या मनाशी आहे. धर्म हा मन आणि आत्मा यांना प्रोत्साहीत करतो. म्हणजेच एकप्रकारे धर्म हा मनाचा आणि आत्म्याचा मार्गदर्शक आहे. धर्मामध्ये चित्त एकाग्र करण्यासाठी किंवा चंचल मनाला स्थिर करण्यासाठी संगीताचा आधार घेतला जातो. प्राचीन काळापासूनच भारतीय संगीत हे प्रत्यक्षात धर्माशी जोडले गेलेले आहे. कारण धर्माचे अंतिम ध्येय मोक्षप्राप्ती आहे तर संगीत हे या मोहमायेच्या पाशापासुन मुक्त करून अत्युच्च असा आनंद प्राप्त करून देते आणि परमात्म्याशी संवाद साधते म्हणजे एकप्रकारे संगीत हे भक्त आणि परमात्म्यामधील दुव्याचे काम करते. म्हणूनच कोणत्याही धर्मपरंपरेत संगीताचे अनन्य साधारण महत्व आहे. आणि हे सर्व पाहील्यास आपण हेच म्हणू शकू की, धर्म व संगीत हे एकमेकांस पुरक असेच आहेत.

## ३. अध्यात्म आणि संगीत :

सर्व धर्मांचा संबंध हा मनुष्याच्या मनाशी आहे. धर्म ही वस्तू नसून एक अमूर्त धारणा आहे. जी मन आणि आत्म्याला कार्यान्वित करते. अध्यात्म हे आत्मिक समाधान देणारे शास्त्र आहे. अध्यात्म म्हणजे मनुष्यरूपी प्राण्याच्या मनास ईश्वराकडे खेचून घेणे आणि त्याला ईश्वराचा साक्षात्कार करून देणे किंवा चैतन्यस्वरूप असलेल्या आत्मज्ञानास प्राप्त करण्यासाठी जो अभ्यास करावा लागतो किंवा जे जप तप करावे लागते त्याला अध्यात्म असे म्हणतात. याचाच अर्थ अध्यात्म सुध्दा आत्म्याच्या उन्नतीसाठी कार्य करते आणि धार्मिक आचरणाने आत्म्याची उन्नती होते. एकंदरीत धर्म आणि अध्यात्म हे एकाच नाण्याच्या दोन बाजु आहेत. ज्याप्रकारे धर्मात चित्त एकाग्र करण्यासाठी संगीताचा आधार घेतला जातो त्याचप्रकारे आध्यात्मिक उन्नतीकरिताही संगीताचा आश्रय घेतला जातो.

भारतीय संगीत हेच मुळात आध्यात्मिक संगीत आहे. ईश्वर उपासना करतांना मन अथवा चित्त एकाग्र करण्यासाठी एक शक्तीशाली माध्यम म्हणून संगीताचा उपयोग केला जातो. काही विद्वानांच्या मते ईश्वरप्राप्तीसाठी संगीत हा सर्वात जवळचा मार्ग आहे तर काही विद्वानांनी संगीतरूपी नादब्रम्हालाच ईश्वर मानले आहे. यांसोबतच वेद आणि ऋषीमुनी व साधु संतानी देखिल ईश्वर प्राप्तीसाठी आणि ईश्वराशी थेट संवाद साधण्यासाठी किंवा संबंध जोडण्यासाठी अत्यंत सोपा व सरळ मार्ग म्हणून संगीताचा आधार घेतला आहे. असे म्हणतात की,

वीणा वादन तत्वज्ञः श्रुति जाती विशारदः।
तालज्ञश्चा प्रयासेन मोक्षमार्गं निगच्छतिः॥ **(याज्ञवल्क्य स्मृति)**

अर्थात वीणावादन करणारा, श्रुति व जाती म्हणजे स्वरांशी ओळख असलेला आणि तालज्ञानाचा अभ्यास असलेला व्यक्ति विनासायास मोक्ष मिळवितो.

नाहं वसामि वैकुण्ठे योगिनां हृदये न च ।
मद्भक्ताः यत्र गायन्ति तत्र तिश्ठामि नारदः । **(श्रीकृष्ण नारद संवाद)**

अर्थात भगवान श्रीकृष्ण म्हणतात, मी वैकुंठात किंवा योग्यांच्या हृदयातही राहत नाही तर माझे भक्त जेथे माझे गुणगान गात असतात तेथे मी राहतो. यातून ईश्वराला संगीत किती प्रिय आहे याची अनुभूती येते.

संगीतातून मनाची एकाग्रता साधून श्रोत्याला व कलाकाराला चैतन्याचा अनुभव मिळतो. स्वर हे निर्गुण, निराकार, अस्पर्श व पवित्र असल्याने त्यातून निर्माण होणारी स्पंदने आणि आंदोलने ही शरीर व मनाच्या अस्थिरतेला शांत करून आत्म्यापर्यंत पोहचतात व द्वैतभाव नष्ट करून मानवास आपले अस्तित्व विसरायला भाग पाडतात. मानवासोबतच पशु - पक्षी, गायी - गुरे सुध्दा सुरांमध्ये तल्लीन होतात. म्हणूनच संगीताच्या साथीने मानवाच्या मनातील चंचल वृत्तीला लगाम घालून त्यामध्ये ईश्वरीय भावना जागृत करणे व त्याच्या मनात विश्वकल्याणाचे बीज रोवणे हा अध्यात्माचा हेतू संगीताच्या माध्यमातून मोठ्या दिमाखाने साध्य होतो.

## ४. संगीत आणि साहित्य:

संगीत आणि साहित्य हे मनातील भाव व्यक्त करण्याची प्रमुख साधने आहेत. यांतील शब्द आणि स्वरांद्वारे मनाच्या अवस्था प्रकट करता येतात. आपण वर्षानुवर्षे ऐकत व अनुभवत असलेल्या काही वाद्यांचा आपल्या मनातील भावनांशी संबंध निर्माण झाला आहे. एकंदरीत या वाद्यांच्या अविष्कारात शब्द नसतात परंतु विशिष्ट भावविश्व निर्माण करण्याची जबरदस्त शक्ती असते. कुठलाही भाव किंवा भावना यांना आकार नसतो त्या निर्गुण निराकार असतात. त्या भावनांना आकार देऊन दुसऱ्यापर्यंत पोहचविण्याचे कार्य संगीत किंवा साहित्य करते. म्हणजेच शब्दातील भावनांना मूर्त रूप देण्याचे काम संगीत करते. साहित्य जर समाजाचा आरसा असेल तर संगीत हे समाजाच्या मनाचे प्रतिबिंब आहे. याबाबत स्व. राष्ट्रकवी मैथिलीशरण गुप्त म्हणतात की, “संगीत भी एक प्रकार का साहित्य ही है ।“

तसे पाहिले तर प्राचीन वैदिककाळापासून शब्द आणि संगीताचा ऋणानुबंध आहे. याचे प्रमाण म्हणजे ऋग्वेदातील गेय ऋचा स्वरांमध्ये म्हणण्याचा प्रघात होता. आपण देवदेवतांना प्रसन्न करण्यासाठी गात असलेल्या प्रार्थना, स्तवने हे सुध्दा स्वरतालांत

**Shikshan Sanshodhan : Journal of Arts, Humanities and Social Sciences** ISSN: 2581-6241 Volume - 3, Issue - 3, May-June – 2020
Bi-Monthly, Peer-Reviewed, Refereed, Indexed Journal Impact Factor: 3.589
Received on : 04/06/2020 Accepted on : 24/06/2020 Publication Date: 30/06/2020

बांधलेली असतात. त्यामुळे साहित्य आणि संगीत यांचा पावित्र्याशी अनोखा संबंध निर्माण झाला. आणि संगीत हे धर्माधिष्ठित शब्दांमधून जनसामांन्यापर्यंत पोहचू लागले. परिणामी संतांनी याचा पुरेपूर लाभ घेतला आणि सर्वसामान्य जनतेसाठी रचनांचा असंख्य मोठा महासागर निर्माण केला. त्यामध्ये आपापल्या आराध्याप्रतीच्या प्रार्थना, मराठी अभंग, हिंदी भजने, भारूडे, गवळणी, निरनिराळी पदे इत्यादिंचा समावेश होतो. आणि या रचना संगीताच्या मदतीने भोळया भाबड्या लोकांपर्यंत पोहचवून आध्यात्मिक उन्नती साधली. वास्तविकपणे साहित्य आणि संगीत या दोन्हींचा संबंध ध्वनी किंवा नादाशी येतो. दोन्हीही नादात्मक कला आहेत. परिस्थितीनुसार कधी संगीत प्रभावी ठरते तर कधी साहित्य. एकंदरीत संगीताविना साहित्य आणि साहित्याविना संगीत हे अपूर्ण आहेत.

## ५. मंदीर व धार्मिक संस्थानातील संगीत :

संत महात्म्यांनी धर्माचा प्रचार व प्रसार करण्यासाठी आपापल्या आराध्य दैवतांची मंदीरे स्थापीत करून त्याच ठिकाणी मठ किंवा आश्रम उभारला आणि त्या माध्यमातून धार्मिक प्रचार प्रसार सुरू करून आपापल्या धार्मिक परंपरांची व्याप्ती वाढवली. ज्यातून निर्माण झाले ते म्हणजे धार्मिक अधिष्ठान यालाच आपण धार्मिक संस्थान असेही  म्हणतो. काही ठिकाणी मंदीराची स्थापना झाल्यानंतर हळू हळू तेथिल देवाचा महिमा ऐकूण भक्तगणांची गर्दी जमू लागली आणि त्यातून एक परंपरा निर्माण होऊन धार्मिक संस्थानाची निर्मीती झाली. काही ठिकाणी धर्मप्रचारकांनी कोणत्याही मंदिराशिवाय किंवा सर्व देवतांना आपले आराध्य मानले आणि लोकांना एकत्रित करून एक धार्मिक अधिष्ठान निर्माण करून धार्मिक संस्थानांची स्थापना केली. अशी असंख्य धार्मिक संस्थाने भारतात कार्यान्वित आहेत. ज्यांच्याद्वारे धार्मिक कार्याबरोबरच संगीताचाही तितकाच मोठा वापर केला जातो.

कालांतराने सर्वच संस्थानाची व्याप्ती इतकी वाढली की, प्रत्येक ठिकाणी विश्वस्त मंडळाची स्थापना झाली आणि त्या व्यवस्थापन मंडळाद्वारेच संस्थानच्या माध्यमातून चालत आलेल्या परंपरांचा प्रचार प्रसार आणखी मोठ्या प्रमाणात सुरू झाला. मंदीर किंवा धार्मिक संस्थानातून प्रातःकालीन धार्मिक विधीसोबतच होणारी संगीताची सुरूवात मंदीर बंद होईपर्यंत कोणत्या न कोणत्या स्वरूपात सुरूच असते. त्यामध्ये मंदीरातील घंटा, आरत्या, भजनसंध्या इ.चा समावेश असतो. यासोबतच मंदीरातील विविध देवतेनुसार व परंपरेनुसार विविध धार्मिक प्रसंगी उत्सव व सांगितीक कार्यक्रमांचे आयोजनही संस्थानच्या माध्यमातून करण्यात येते. या धार्मिक संस्थानांचा हेतू किंवा उद्देष हा केवळ मोक्षप्राप्ती हा असल्याने संगीताच्या सहकार्याशिवाय  ती अपूर्ण आहे. त्यामुळे वर्षानुवर्षे संस्थानांच्या माध्यमातून संगीताचा प्रचार व प्रसार होत आहे.

## ६. धार्मिक परंपरा आणि संगीत :

परंपरा म्हणजे चालत आलेली रूढी किंवा रितीरिवाज. परंपरा याविषयी Ross म्हणतात की, “परम्परा का अर्थ चिंतन और विश्वास करने की विधि का हस्तान्तरण होना है।” तर आईवर जैनिंग्ज यांच्या मते “परम्पराएं वे प्रथाएं हैं, जिनमें जनकल्याण की भावना रहती है। यह अंधविश्वास से सर्वथा भिन्न तर्कसंगत आधारों पर टिकी होती है।”

प्रत्येक व्यक्तीचे जसे विविध प्रकारचे स्वभाव वा विचार असतात. त्यानुषंगाने आपल्या मनोइच्छित परमेश्वरापर्यंत पोहंचण्यासाठी तो विविध प्रकारच्या मार्गांचा अवलंब करतो. ते विभिन्न मार्ग म्हणजे विविध धर्म किंवा पंथ होय आणि त्या विविध धर्माच्या धर्मप्रचारकांनी ठरवून दिलेल्या आचरण पध्दती किंवा उपासना पध्दती परंपरागतपणे अविरत सुरू ठेवणे म्हणजे धार्मिक परंपरा होय. त्यानुसार ईश्वराची विविध रूपे आणि विविध उपासना पध्दती यामुळे निरनिराळया धार्मिक परंपरा उदयास आल्या. आणि त्या धार्मिक परंपरा अखंडीतपणे कार्यान्वित आहेत कारण धार्मिक परंपरा या धर्माच्या साथीने विकसीत होतात.

परंपरेने चालत आलेल्या प्रत्येक धार्मिक परंपरांची आपापली वेगळी वैशिष्ट्ये आहेत, वेगवेगळे आचार धर्म आहेत. आणि प्राचीनकाळापासून धर्म आणि संगीत यांचा घनिष्ठ संबंध असल्याने प्रत्येक धार्मिक परंपरांनी आपापल्या परंपरा जपण्यासाठी आणि या परंपरा लोकांपर्यंत पोहचवण्यासाठी विविध प्रकारच्या माध्यमातून संगीताचा वापर करून घेतला आहे व घेत आहेत. यामुळे धर्माच्या कारणी संगीताचा उपयोग होत असल्याने त्याला आपण धार्मिक संगीत असेही म्हणतो. या धार्मिक संगीतामध्ये प्रार्थनागीते, ईशस्तवने, संतानी रचलेल्या उपदेशपर आणि भक्तीपर रचना म्हणजेच अभंग, भजने, पदे, आरत्या इत्यादिंचा समावेश असतो. यासोबतच किर्तनाच्या विविध परंपरामधून, पालखी तसेच दिंड्या आणि विविध प्रसंगी आयोजित करण्यात येणाऱ्या धार्मिक उत्सवांमधून संगीताचा प्रभावीपणे वापर इत्यादिंच्या माध्यमातून आपापल्या धार्मिक परंपरा जपल्या जातात.

## ७. संतांची भुमिका :

भारतात वेगवेगळे धर्म, संप्रदाय व पंथ अस्तित्वात आहेत. प्रत्येकाचे तत्त्वज्ञान, आचारधर्म हे विविध प्रकारच्या उपासनाप्रणालीमुळे विभिन्न असले तरी सर्वसामान्यांचे प्रबोधन व परमार्थ हेच अंतिम उद्दिष्ट आहे. यामुळेच अनेक परकीय आक्रमणानंतरही धर्म व संस्कृती टिकली व अस्तित्वात राहिली. याचे श्रेय त्या त्या प्रांतातील विविध संत महात्म्यांना जाते. विशेषतः हिंदू धर्म व संस्कृती यांची परंपरा या अग्निदिव्यातून चांगली तावूनसुलाखून पार पडली व कसास उतरली ती या संतांच्या माध्यमातूनच. सामाजिक, राजकीय व सत्तांतरणातून पोळुन निघालेल्या सर्वसामान्य जनतेला संतांनी आधार दिला. त्यांना माहित होते की, माणुस उभा राहिला तरच देश उभा राहील हे जाणून घेऊन संतांनी समाज जागृतीचे काम केले. संतांनी कधीच जातीभेद, उच्च - निच, गरीब - श्रीमंत अशी विषमतेची भिंत उभी राहू दिली नाही. व भेदभाव केला नाही. जो समोर आला त्याच्यावर कृपा केली. संत हे चालते फिरते देवच आहेत. गोरगरीब

पिचलेल्या लोकांना आधार देऊन परमेश्वराविषयी व एकमेकांविषयी आदर व प्रेम निर्माण करून समाजाला उभारी देण्याचे महान सत्कार्य संतांनी केले.

हे महान कार्य करतांना संतांनी सुयोग्य संगीताचाही वापर करून घेतला. त्यांनी ओळखले होते की, संगीत हे मनावर परिणाम साधणारे शास्त्र आहे आणि त्याचा सुयोग्य वापर केल्यास परमानंदाची अनुभूती तर मिळतेच त्यासोबतच अपेक्षित परीणाम साधता येतो. म्हणूनच संतांनी अध्यात्मासोबत विविध प्रकारच्या भक्ती व समाजप्रबोधनपर गेय रचना रचल्या ज्यामध्ये काही संतांची नावे अग्रक्रमाने घ्यावी लागतील. त्यात संत ज्ञानेश्वर, संत नामदेव, संत कबीर, संत सुरदास, संत मिराबाई, संत तुकाराम इ. अनेक संतानी मराठी अभंग, हिंदी भजने, गवळणी, भारूडे इत्यादिंच्या शेकडो रचना केल्या. ज्या आजही संगीताच्या साथीने मोठ्या प्रमाणात सर्वत्र गायल्या जातात.

## ८. निष्कर्ष :

- धर्म व त्याच्याशी निगडीत असलेल्या अध्यात्म, साहित्य, धर्म परंपरा, संत व त्यांचे कार्य या सर्व घटकांनी जनसामान्यांपर्यंत आपापले ज्ञानमार्ग व उपासना पध्दती पोहचवण्यासाठी आणि आत्मिक परमानंद मिळविण्यासठी संगीताचा पुरेपूर वापर करून घेतला.
- धर्माशी निगडीत असलेल्या वरील व ईतरही सर्व गोष्टी या संगीताशिवाय अपूर्ण आहेत किंवा धार्मिक परंपरेतील सर्व घटक आणि संगीत हे एकमेकांस पूरक आहेत व ते एकमेंकाशिवाय परिपूर्ण होऊच शकत नाहीत.
- धार्मिकता आणि संगीत या दोन्हींच्या प्रचार व प्रसारात संतांचे अतिशय मोठे योगदान आहे.
- संतांच्या माध्यमातून तयार झालेल्या धार्मिक रचनांना संगीताची साथ मिळाल्यामुळे त्या अतिशय प्रभावी ठरल्या व त्यातून धर्म परंपरा व ईश्वरभक्ती जपण्याबरोबरच राष्ट्रभक्ती, जनजागृती व सामाजिक ऐक्य इ. साधले जात आहे.
- एकंदरीत सर्व गोष्टींचे अध्ययन केल्यावर मला असे वाटते की, या सर्व धार्मिक परंपरांवर संगीताने राज्य केले आहे असे म्हंटले तर अतिशयोक्ती ठरणार नाही. कारण संगीताच्या साथीशिवाय धर्मपरंपरा कधीच पाहिजे त्या उंचीवर पोहचल्या नसत्या किंवा प्रचार प्रसार पावल्या नसत्या.

## संदर्भ ग्रंथ सुची :

1) डॉ,नत्थुलाल गुप्त, 'भारत की धार्मिक परम्परा', राधा पब्लिकेशन दिल्ली, 2012
2) रेनू सचदेव, 'धार्मिक परम्परायें एवं हिन्दुस्तानी संगीत', राधा पब्लिकेशन दिल्ली, 1999
3) डॉ. भारती शर्मा, 'सांगीतिक एवम् धार्मिक परम्परा', संजय प्रकाशन दिल्ली, 2006
4) डॉ. यू.म.पठाण, 'महाराष्ट्राची परंपरा', दिलीपराज प्रकाशन प्रा.लि. पूणे, 2012
5) किरण फाटक, 'संगीत निबंधावली', संस्कार प्रकाशन पूणे, 2000
6) मोहन रामचंद्र कांबळे, 'धर्मदर्शन', आशय प्रकाशन पूणे, 2019